जा.क्र.माध्य-३/१४/विभाजन/पुवि/९०
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,
पुणे.
दिनांक :- ३०-८-१९९०

प्रति,

सचिव,

रयत शिक्षण संस्था,

सातारा.

विषय :- रयत शिक्षण संस्था,सातारा या संस्थेच्या पुणे व अहमदनगर,जिल्ह्यातील दहा माध्यमिक शाळांच्या विभक्ती करणेबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्रं.एसएसएन १३८९/२०१३/माशि-१ दिनांक २५-७-९०.

नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद म्हणून सोबत जोडलेल्या यादीतील आपल्या संस्थेच्या पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील दहा माध्यमिक शाळांचे विभाजन करुन प्रत्येक शाळेची,मुलांची आणि मुलींची अशा दोन स्वतंत्र माध्यमिक शाळा जून १९९० पासून सुरु करण्यास नेहमीच्या अटीवर व विशेषत: खालील खास अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर शासनाने त्यांचे वरील संदर्भांकित पत्रानुसार परवानगी दिलेली आहे.

१) प्रत्येक शाळेच्या दोन्ही स्वतंत्र माध्यमिक शाळातील कोणत्याही वर्गासाठी कोणत्याही परिस्थितीत तुकडी इकेरीची अट शिथील केली जाणार नाही.

२) प्रत्येक शाळेच्या दोन्ही स्वतंत्र शाळांसाठी स्वतंत्र इमारत,फर्निचर प्रयोगशाळा,ग्रंथालय इ. गोष्टींची व्यवस्था असली पाहिजे.

३) स्वतंत्र मुलींच्या माध्यमिक शाळांसाठी एका मुख्याध्यापकाच्या पदा खेरिज इतर कोणत्याही कर्मचारी वर्गाची नेमणूक करता येणार नाही. तसेच त्यावर होणारा खर्च शासनाकडून मान्य केला जाणार नाही.

तरी या बाबत योग्य ती त्वरीत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात पाठवावा.

TRUE COPY

सही/-
शिक्षण उपसंचालक,

प्रत.

१. शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.पुणे/नगर यांना माहितीसाठी व तात्काळ योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२. प्रत माहितीसाठी सादर.

१. मा.अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२

२. मा.शिक्षण संचालक, म.रा.पुणे.

रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेच्या पुणे व नगर जिल्ह्यातील विभाजनास परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांची यादी.

पुणे जिल्हा.

१. संत तुकाराम विद्यालय, देहू ता.हवेली जि.पुणे.

२. हुतात्मा राजगुरु विद्यालय, पांडवनगर जि.पुणे.

३. नव महाराष्ट्र विद्यालय, पिंपरी वाघेरे जि.पुणे.

अहमदनगर जिल्हा.

१. जनता विद्यालय, काष्टी ता.श्रीगोंदा.

२. महात्मा गांधी विद्यालय, प्रवरानगर.

३. न्यू इंग्लिश स्कूल, सात्राळ ता.राहुरी.

४. नागेश विद्यालय, जामखेड.

५. शारदा विद्यामंदिर राहता ता.कोपरगांव.

६. महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा.

७. श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय, कोळेवाडी ता.कोपरगांव.

/सही-मजकूर/

सहसचिव (माध्य)
रयत शिक्षण संस्था, सातारा.

TRUE COPY
Head Mistress
H. Rajguru Vidyalaya
Girls, Pandavnagar, Pune-16.

TRUE COPY
Head Mistress
H. Rajguru Vidyalaya
Girls Pandavnagar Pune-16

TRUE COPY
Head Mistress
H. Rajguru Vidyalaya
Pandavnagar, Pune

प्रभारी मुख्याध्यापिका
हुतात्मा राजगुरु विद्यालय (मुलींचे)
पांडवनगर, पुणे-१६.